**महाराष्ट्र जनशक्ती** | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३८ वे | दिनांक : ३०/०१/२०२६ | वार : शुक्रवार

## दृश्यमानता कमी, तरी सीसीटीव्ही फुटेज इतके स्पष्ट कसे? - अजितदादांच्या अपघातावरून सुषमा अंधारेंचा सवाल



**पुणे :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी विमान अपघातात निधन झाले. बारामती विमानतळावर त्यांचे विमान लँड होत असतानाच भीषण अपघात झाला आणि होत्याचे नव्हते झाले. विमान लँड करत असताना दृश्यमानता कमी असल्याने अपघात झाल्याचे बोलले जात आहे. परंतु, यावरून आता शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी शंका उपस्थित केली आहे.

सुषमा अंधारे यांनी ट्विट करत म्हटले की, बारामती विमानतळावर कमी दृश्यमानता होती म्हणून अपघात झाला असे अनेकजण अपघाताचे कारण सांगत आहेत. पण खूप दूरच्या सीसीटीव्हीमध्ये विमान घिरट्या घालताना स्पष्ट दिसत होते. जर तिथे धुक्याचे वातावरण असेल तर सीसीटीव्हीतील घिरट्या घालतानाचे फुटेज इतके स्पष्ट कसे? असा सवाल अंधारे यांनी उपस्थित केला आहे.

पुढे सुषमा अंधारे म्हणाल्या, काल लगेच यावर बोलणे संकेताला धरून नसले तरी तृणमूल कॉंग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती ममता बॅनर्जी यांनी उपस्थित केलेले प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. ही चौकशी झालीच पाहिजे किंवा ही चौकशी आम्ही अगदी आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा करू असे सत्ताधाऱ्यांमधला एकही नेता ठामपणे का बोलत नाही? अजितदादांच्या नंतर पक्षातील जेष्ठता क्रम असणारे प्रफुल्ल पटेल, हसन मुश्रीफ किंवा दिलीप वळसे पाटील यांनी मौन का बाळगले आहे? साहेबांचे राष्ट्रवादीतले ही ज्येष्ठ नेते यावर का बोलत नाहीत? असे प्रश्न सुषमा अंधारे यांनी उपस्थित केले आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्राकडे पत्र पाठवून या अपघाताची चौकशी करण्याची मागणी केली होती. त्यांच्या मागणीनुसार केंद्रीय उड्डाण मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांनी चौकशी होणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यानुसार याची चौकशी एएआयबी संस्थेकडून तपास सुरू करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

## लग्नाला दोन महिने बाकी असतानाच काळाचा घाला



**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच जणांचा बळी घेणाऱ्या या भीषण विमान दुर्घटनेने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. या अपघातात विमानाचे मुख्य पायलट कॅप्टन कपूर आणि सहपायलट शांभवी पाठक यांचाही करुण अंत झाला. अवघ्या 25 वर्षांच्या शांभवीने वैमानिक म्हणून आकाशात उंच झेप घेण्याचे स्वप्न पाहिले होते, मात्र त्या स्वप्नांचा शेवट याच विमान अपघातात झाला. विशेषतः शांभवीच्या निधनाने पाठक कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. तिने शिक्षण पूर्ण करून करिअरमध्ये उत्तुंग यश मिळवल्याने घरात तिच्या लग्नाची लगबग सुरू होती. अवघ्या दोन महिन्यांवर लग्न आलेले असतानाच काळाने हा क्रूर वार केला, ज्यामुळे एका उमद्या तरुणीच्या स्वप्नांचा आणि एका कुटुंबाच्या आनंदाचा अकाली अंत झाला आहे.

मार्च महिन्यात लग्नाच्या बेतात असलेल्या शांभवीच्या घरी सध्या आनंदाची लगबग असायला हवी होती, मात्र त्याऐवजी तिथे आता भीषण शांतता आणि शोककळा पसरली आहे. दिल्लीतील सफदरजंग एन्क्लेव्हमध्ये नुकत्याच घेतलेल्या नव्या घराचा गृहप्रवेश आणि नव्या आयुष्याची स्वप्ने उराशी बाळगलेल्या शांभवीच्या जाण्याने, त्या घरात अजूनही सामानाने भरलेल्या पेट्या तिच्या अपूर्ण राहिलेल्या आकांक्षांची साक्ष देत आहेत. उत्साही आणि हसतमुख स्वभावाच्या शांभवीच्या अकाली निधनाने केवळ तिचे कुटुंबच नव्हे, तर अवघा परिसर हळहळत असून, नियतीने तिच्या आयुष्याचे धागे ज्या पद्धतीने तोडले, ते पाहून प्रत्येकजण व्यथित झाला आहे.

लग्नाची लगबग, नव्या घराचा गृहप्रवेश आणि मुलीच्या उज्ज्वल भविष्यासाठी आखलेली स्वप्ने असा सगळा आनंदी माहोल असलेल्या पाठक कुटुंबावर को-पायलट शांभवीच्या निधनाने दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दिल्लीतील सफदरजंग एन्क्लेव्ह येथील घरात नव्या आयुष्याची सुरुवात करण्यासाठी जय्यत तयारी सुरू असतानाच, लग्नाची तारीख येण्यापूर्वीच लाडक्या लेकीला अखेरचा निरोप देण्याची दुर्दैवी वेळ आई-वडिलांवर आली. एअरफोर्स बाल भारती शाळेत शिक्षिका असलेल्या शांभवीच्या आईसाठी हा धक्का पचवणे अत्यंत कठीण झाले असून, गृहप्रवेशाच्या नियोजनाने सजलेले घर आज केवळ तिच्या आठवणींनी आणि शांततेने व्यापले आहे.

शांभवी पाठक यांच्या अकाली निधनाने केवळ तिचे कुटुंबच नव्हे, तर तिचे शेजारी, मित्र आणि परिचितही अत्यंत व्यथित झाले असून, तिच्याबद्दल बोलताना प्रत्येकाचा कंठ दाटून येत आहे. अत्यंत नम्र, कमालीचा आत्मविश्वास आणि प्रेमळ स्वभाव ही शांभवीची खरी ओळख होती.

## सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री करा : मंत्री नरहरी झिरवाळ यांची मागणी



**मुंबई :** अजित पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होत असतानाच राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या राजकारणात मोठी खळबळ उडवणारे वक्तव्य समोर आले आहे. राष्ट्रवादीचे नेते नरहरी झिरवाळ यांनी थेट सुनेत्रा पवार यांना राज्याचे उपमुख्यमंत्रीपद देण्याची मागणी करत अजित पवार यांच्या पश्चात निर्माण झालेल्या नेतृत्वाच्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका मांडली आहे. झिरवाळ यांच्या या विधानानंतर राज्याच्या राजकारणात आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये नव्या हालचालींना वेग येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

दुसरीकडे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांनी सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्याचे समोर आले आहे. मात्र, ही भेट नेमकी कशाबद्दल होती, याची माहिती अजून पुढे आली नाही.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात शासकीय सन्मानात अंत्यसंस्कार करण्यात आले. बुधवारी बारामतीत झालेल्या भीषण विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. त्यांच्या अंतिम दर्शनासाठी आणि अंत्यसंस्कारासाठी बारामतीत हजारोंचा जनसागर उसळला होता. सर्वसामान्य नागरिकांपासून ते राजकीय नेत्यांपर्यंत, प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रू होते. आपल्या लाडक्या ‘दादा’ला अखेरचा निरोप देताना संपूर्ण बारामती भावुक झाली होती.

अजित पवार यांच्या पार्थिवाला त्यांचे पुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांनी मुखाग्नी दिला. चिता पेटताना उपस्थितांची मने सुन्न झाली होती. अंत्यसंस्काराच्या संपूर्ण विधी दरम्यान पार्थ पवार आणि जय पवार हेच प्रमुखपणे समोर उभे राहून सर्व मान्यवरांच्या भेटी घेत होते. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे वरिष्ठ नेते आणि पवार कुटुंबातील इतर सदस्य खाली बसून होते. त्यामुळे अनेकांच्या नजरा पार्थ आणि जय पवार यांच्यावर खिळल्या होत्या. अजित पवार यांचे राजकीय वारसदार म्हणून हे दोघे पुढे येणार, असे संकेत यातून मिळाल्याची चर्चा सुरू झाली.

अजित पवार हे केवळ राज्याचे उपमुख्यमंत्री नव्हते, तर ते अर्थमंत्री, बारामती विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा होते. त्यांच्या अचानक जाण्यामुळे एकाच वेळी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या रिक्त झाल्या आहेत. त्यामुळे या जागा कोण भरणार, पक्षाची धुरा कोण सांभाळणार आणि सरकारमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसची भूमिका काय असेल, असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर अजित पवारांच्या अंत्यसंस्कारानंतर लगेचच नरहरी झिरवळ यांनी केलेल्या वक्तव्याने या चर्चांना अधिकच धार दिली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते नरहरी झिरवाळ यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, अजित पवार यांच्यानंतर सुनेत्रा पवार यांना राज्याचे उपमुख्यमंत्रीपद देण्यात यावे. झिरवाळ यांच्या या मागणीने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. अजित पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी पक्षाने तातडीने निर्णय घ्यावा, असा संकेत या विधानातून देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अंत्यसंस्काराच्या दिवशीच अशी मागणी समोर आल्यामुळे तिचे राजकीय महत्त्व अधिक वाढले आहे.

पवार कुटुंबीय हे कायमच राजकारणात प्रॅक्टिकल आणि दूरदृष्टीने विचार करणारे मानले गेले आहेत. परिस्थितीची गरज, पक्षाची दिशा आणि सत्तासमीकरणे ओळखून निर्णय घेण्याची परंपरा या कुटुंबाची राहिली आहे. त्यामुळे एका बाजूला अजित पवार यांच्या जाण्याचे दु:ख असले, तरी दुसऱ्या बाजूला राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये कोणतीही निर्नायकी अवस्था निर्माण होऊ नये, यासाठी हालचाली सुरू झाल्याचे चित्र आहे. झिरवळ यांच्या मागणीमागेही हाच राजकीय व्यवहार्यतेचा विचार असल्याचे बोलले जात आहे.

अजित पवार यांच्या अंत्यविधीत दिसलेली मांडणी, पार्थ आणि जय पवार यांची सक्रिय उपस्थिती आणि त्यानंतर लगेच सुनेत्रा पवार यांच्या नावाची चर्चा, या सर्व घटनांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या भविष्यातील नेतृत्वाबाबत संकेत दिले आहेत. पक्षात नेतृत्वाची धुरा कुणाकडे जाणार, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर, उपमुख्यमंत्रीपदासाठी नेमका कोणता चेहरा पुढे येणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

अजित पवार यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढणे हे राष्ट्रवादी कॉंग्रेससमोरील मोठे आव्हान आहे. झिरवाळ यांच्या विधानामुळे हे आव्हान अधिक ठळकपणे समोर आले आहे. येत्या काही दिवसांत पक्षांतर्गत बैठकांमध्ये आणि सत्ताधारी आघाडीत यावर सखोल चर्चा होण्याची शक्यता आहे. अजित पवार यांच्या पश्चात राष्ट्रवादी कॉंग्रेसची दिशा, नेतृत्व आणि सत्तेतील भूमिका काय असेल, यावरच राज्याच्या राजकारणाचे पुढचे चित्र ठरणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३० जानेवारी २०२६


## खुलताबाद तालुक्यात ज्वारीचे पीक निम्म्याने घटले



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यामध्ये दरवर्षी ज्वारीचे प्रमाण जास्त असते परंतु यावर्षी तालुक्यात रब्बी ज्वारीच्या पेरणी क्षेत्रात आणि उत्पादनात मोठी घट झाली आहे. हवामान बदल कमी बाजार भाव, आणि ऊस,कांदा,गहू या पिकांकडे शेतकऱ्यांचा कल असल्यामुळे हे प्रमाण घटले आहे पिकावर पडणारी कीड यामुळे ही पारंपारिक पिके कमी होत आहेत.सध्या आभाळी वातावरण असल्याने गारपीट होण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकरी चिंतातूर दिसत आहेत.तालुक्यातून रब्बी हंगामातील ज्वारी नामशेष होत असताना दिसत आहे. रब्बी हंगामातील क्षेत्र घटत असेल,तर शेतकऱ्यांपासून ते सरकारपर्यंत याचे गांभीर्याने चिंतन व्हायला पाहिजेत.आपल्या राज्याचे ज्वारी हे मुख्य पीक आणि ज्वारीची भाकरी हेच मुख्य अन्न.बदलत्या आहार शैलीत आपल्या ताटातून ज्वारीची भाकरी गायब होऊन त्याची जागा गव्हाच्या चपातीने घेतली आहे. इतर धान्यांच्या तुलनेत या ज्वारीमध्ये कार्बोहायड्रेट, कॅल्शियम, प्रोटीन, व्हिटॅमिन, खनिज पदार्थ याचे प्रमाण अधिक असल्याने खाण्यासाठी ही ज्वारी उत्तम मानली जाते. त्यामुळे निरोगी आयुष्यासाठी जेवणात ज्वारीचे महत्व आहे.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


## न्यायालयातही आपल्याला न्याय नाही का ? - सचिन निकम

**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा पेक्षा सवर्णांची मर्जी राखणे न्यायालयाला अधिक महत्त्वाचे वाटले का? - रिपब्लिकन विद्यार्थी सेनेचा सवालआज मा. सर्वोच्च न्यायालयाने UGC च्या समतेवर आधारित(Promotion of Equity in Higher Education Institutions Regulations, 2026)या नवीन नियमांना स्थगिती (STAY) देत नव्याने मसुदा तयार करण्याचे आदेश दिले आहेत या मागे न्याय व्यवस्थेवर असलेला मनुवादाचा प्रभाव जबाबदार आहे.SC, ST, OBC बांधवांना धर्माच्या नावावर संघटित करण्याचे काम करणाऱ्या मनुवादी–ब्राह्मणी व्यवस्थेचा खरा चेहरा या निमित्ताने पुन्हा एकदा समोर आला आहे.SC, ST, OBC यांना धर्माचे डोस द्यायचे आणि अधिकार मागितले की त्यांच्या गळ्याला फास देण्याची कुटनीती ही व्यवस्था सातत्याने राबवत आहे.एकीकडे सर्वोच्च न्यायालय रोहित वेमुला व डॉ. पायल तडवी यांच्या प्रकरणांनंतर शैक्षणिक संस्थांमध्ये समतेसाठी ठोस नियमावली तयार करण्याचे निर्देश देते, आणि दुसरीकडे मूठभर मनुवादी शक्तींच्या दबावाखाली त्याच नियमांना स्थगिती देऊन नव्याने मसुदा तयार करण्यास सांगते-हे न्यायालयीन व्यवस्थेवर मनुवादी शक्तींचे झालेले अतिक्रमण असल्याचा गंभीर आरोप रिपब्लिकन विद्यार्थी सेना करत आहे.मुळात UGC च्या नवीन नियमांतील तरतुदींमुळे धर्माचा ढोल बडवणाऱ्या सवर्ण गटांनी इतका धसका घेतला की कोणी इच्छामरण, कोणी राजीनामे, तर कोणी आत्मदहनाच्या धमक्या देऊ लागले. आणि या दबावापुढे झुकत न्यायव्यवस्थेने तात्काळ स्थगिती दिली— याचा अर्थ देशाच्या शिक्षण व्यवस्थेतील सुधारणांपेक्षा सवर्णांची मर्जी राखणे न्यायालयाला अधिक महत्त्वाचे वाटले का? असा थेट सवाल आम्ही उपस्थित करत आहोत.UGC ने प्रस्तावित केलेली नियमावली मुळातच फार सक्षम नव्हती. मात्र आता नव्याने मसुदा तयार होत असताना SC, ST, OBC समूहाने डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवणे गरजेचे आहे. जुन्या मसुद्यात राहिलेल्या सर्व त्रुटी दूर करून त्या नव्या मसुद्यात समाविष्ट झाल्याच पाहिजेत. तसेच या नियमांची तात्काळ अंमलबजावणी होण्यासाठी रस्त्यावरच्या संघर्ष करण्याचे आवाहन आम्ही आंबेडकरी जनता व विद्यार्थ्यांना करीत आहोत.नवीन मसुदा तयार करताना आमच्या प्रमुख मागण्या :१) UGC Promotion of Equity in Higher Education Institutions Regulations, 2026 तात्काळ लागू करण्यात याव्यात.२) IIT, IIM, Standalone Institutions तसेच सर्व प्रकारच्या उच्च शिक्षण संस्थांना या नियमावलीच्या कक्षेत आणण्यात यावे.३) पॉलिटेक्निक, शिक्षक प्रशिक्षण संस्था, नर्सिंग संस्था यांसारख्या AICTE, NCTE आणि INC या स्वायत्त नियामक संस्थांच्या अखत्यारीतील सर्व शैक्षणिक संस्थांनाही या नियमावलीच्या कक्षेत समाविष्ट करण्यात यावे.४) अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी, विधी (कायदा) विद्यापीठे व महाविद्यालये, तसेच UGC कायद्याच्या कलम ३ अंतर्गत न येणाऱ्या इतर सर्व शैक्षणिक संस्थांचा २०२६ च्या नियमावलीत समावेश होतो की नाही, याबाबत स्पष्टता आणावी.५) भेदभावाच्या सर्व स्वरूपांची स्पष्ट, एकसमान व सर्वसमावेशक व्याख्या नियमावलीत समाविष्ट करण्यात यावी.६) समता समिती (Equity Committee) मध्ये SC/ST/OBC प्रतिनिधित्व किमान ५०% असावे.७) भेदभावविरोधी तक्रार निवारण प्रक्रिया स्वतंत्र, पारदर्शक, वेळबद्ध व न्याय्य करण्यात यावी. अशी मागणी सचिन निकम, मराठवाडा अध्यक्ष रिपब्लिकन विद्यार्थी सेना यांनी केली आहे.

## अजित पवारांच्या अपघातग्रस्त विमानाचा इतिहास



**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर, ज्या विमानाचा अपघात झाला त्या 'लिअरजेट ४५' (Learjet 45) विमानाबद्दल आणि ते चालवणाऱ्या कंपनीबद्दल अनेक खळबळजनक तपशील समोर येत आहेत. हे विमान केवळ अजित दादांच्या प्रवासासाठीच नाही, तर यापूर्वी देशातील अनेक दिग्गज नेत्यांच्या दिमतीलाही होते, अशी माहिती आता समोर आली आहे.

बारामती येथे बुधवारी (२८ जानेवारी) झालेल्या भीषण विमान अपघातात मृत्युमुखी पडलेले उपमुख्यमंत्री अजित पवार ज्या विमानातून प्रवास करत होते, त्या विमानाचा इतिहास अत्यंत 'हाय-प्रोफाईल' असल्याचे समोर आले आहे. व्हीएसआर व्हेंचर्स (VSR Ventures) या कंपनीच्या मालकीच्या 'लिअरजेट ४५' या विमानाने गेल्या वर्षीच्या बिहार विधानसभा निवडणुकीत अनेक बड्या नेत्यांना सेवा दिली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, २०२५ मध्ये पार पडलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी भाजप नेत्यांकडून याच विमानाचा वापर करण्यात आला होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्यासह भाजपच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांनी निवडणूक प्रचारासाठी पाटण्याला जाण्यासाठी याच विमानाचा वापर केला होता. विशेष म्हणजे, कालच्या अपघातात जीव गमावलेले कॅप्टन सुमित कपूर आणि कॅप्टन शांभवी यांनीच या नेत्यांचे वैमानिक म्हणून काम पाहिले होते.

'व्हीएसआर व्हेंचर्स' ही कंपनी बिहारमधील मुझफ्फरपूर येथील रहिवासी कॅप्टन व्ही. के. सिंह यांच्या मालकीची आहे. या कंपनीच्या सुरक्षिततेबाबत आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे, कारण ज्येष्ठ पत्रकार सुहेल सेठ आणि इतरांनी या कंपनीच्या विमानांच्या देखभाल-दुरुस्तीवर गंभीर आरोप केले आहेत.

२८ जानेवारी रोजी या विमानाचे वेळापत्रक अत्यंत व्यस्त होते. अजित पवारांना बारामतीत सोडल्यानंतर हे विमान तेलंगणातील शमसाबाद विमानतळावरून आंध्र प्रदेशचे प्रसिद्ध व्यापारी महेश कुमार रेड्डी यांना घेऊन पाटण्याला जाणार होते. सकाळी १०:३० वाजता हे विमान पाटण्याला उतरणे अपेक्षित होते. रात्री ९:३० वाजता पुन्हा पाटण्याहून उड्डाण करण्याचे नियोजन होते. मात्र, बारामतीत झालेल्या भीषण अपघातामुळे हे नियोजन कोलमडले आणि त्यानंतर महेश रेड्डी यांना दुसऱ्या चार्टर्ड विमानाने पाटण्याला जावे लागले.

एकाच विमानाने देशातील इतक्या महत्त्वाच्या नेत्यांना सेवा दिली असताना, त्याच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड झाली होती का? तसेच या विमानाचा देखभालीचा रेकॉर्ड कसा होता? या दिशेने आता नागरी विमान वाहतूक संचालनालय (DGCA) तपास करत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३० जानेवारी २०२६

## उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या दु:खद निधनाच्या पार्श्वभूमीवर मुरूममध्ये सर्वपक्षीय शोकसभा



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे बारामती येथे विमान लँडिंग दरम्यान झालेल्या अपघातात दु:खद निधन झाले. या घडलेल्या दु:खद घटनेच्या पार्श्वभूमीवर शहरातील शिवाजी चौकात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह सर्वपक्षीय व समस्त शहरवाशियांच्या वतीने शोकसभा बुधवारी (ता.२८) रोजी आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अनेकांनी अजितदादा पवार यांच्या दीर्घ प्रशासकीय अनुभव, समयसूचक निर्णयक्षमता आणि विकासाभिमुख नेतृत्वाचा उल्लेख केला. राज्याच्या राजकारणात दादा माणूस म्हणून ओळख असलेले अजितदादा पवार यांनी जलसिंचन, ऊर्जा, कृषी, पायाभूत सुविधा, अर्थ आणि आपत्ती व्यवस्थापन आदि विविध क्षेत्रात महत्वपूर्ण निर्णयांमुळे महाराष्ट्राला दिशा दिल्याच्या भावना पत्रकार मोहन जाधव, माजी प्राचार्य दत्तात्रय इंगळे, भगत माळी, किरणसिंग गहेरवार, डॉ. नितीन डागा, श्रीकांत मिनीयार आदींनी व्यक्त केल्या. या शोकसभेला शहरातील सर्वच राजकीय पक्षांचे पदाधिकारी, विविध सामाजिक संघटनांच्या प्रमुखांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी सामूहिक आदरांजली अर्पण करून दुखवटा पाळला.

## दादांच्या हस्ते अय्युब पठाण यांना मिळाला होता पहिला पुरस्कार



**छत्रपती संभाजीनगर : (प्रतिनिधी)** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित दादा पवार यांच्या हस्ते अय्युब पठाण लोहगावकर यांना २०१२ मध्ये पुणे येथील बालगंधर्व नाटयमंदिर येथे पठाण यांच्या जीवनातील ना. अजित दादा पवार यांच्या हस्ते पठाण यांच्या जीवनातला पहिलाच पुरस्कार हा पठाण यांच्या पहिला कवितासंग्रह "जिव्हाळा" या कविता संग्रहाला राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार मिळालेला होता. आणि पुढे अय्युब पठाण यांनी दादांच्या पवित्र हस्ते हा पुरस्कार घेऊन दादांचे आशिर्वाद व प्रोत्साहन घेतले होते. अजित दादा पवारांच्या हस्ते हा जीवनातला पहिला पुरस्कार अय्युब पठाण यांना मिळालेला होता. सन २०१२ ते २०२६ या १५ वर्षाच्या काळात श्री. पठाण यांना आज पर्यंत ७० राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहे ते दादांनी दिलेल्या आशिर्वाद व प्रोत्साहानामुळेच. आणि आज अजित पवार दादांची विमान अपघातात निधन झाल्याची बातमी टि.व्ही.वर ऐकून अय्युब पठाण यांना अश्रु अनावर झाले. अजित दादा पवार यांनी पठाण यांना पुरस्कार देतांनाचे जुने फोटो पाहून पठाण यांना रडू कोसळले. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती मिळो अशी प्रार्थना पठाण यांनी पानावलेल्या डोळयांनी परमेश्वराकडे केली आहे.

# बाईचा दस्तवेज : बाई! अलवार वेदनेचा हुंकार




**ख्या**तनाम कवी साक्षेपी निवेदक श्रीनिवास म्हस्के यांचा 'बाईचा दस्तवेज' हा अत्यंत सृजनशील चिंतन आशय संपन्न सृजन भावनेचा हळूवार ओलावा देणारा हा कवितासंग्रह. बाई-बाप.ई-इश्वर. बाई निर्मिकांची शक्ती.मातृत्व देणगी.अंनत काळाची माता.दु:खात वात होऊन जळणारी प्रकाशाची ज्योत.मातृत्वाचा पान्हा.दुधाचे अंनत अंबर.तसे ललाटांचे जन्माचे झुंबर देऊन ती वेदनेच्या डोहात बाळांन्ताच्या यातनेतून जीवाला जन्म देते.अन्मातीच्या चरणी लीन होते.ती बाई दस्तवेज म्हणजे तिच्या प्रश्नांकित खडतर जगण्याचे काटेरी कुंपण.कवीवर्य श्रीनिवास या नावातचं आत्मश्वासांकित प्रारंभ प्रार्थनेचा शब्द अनुबंध आहे तो म्हणजे 'श्री'. या कवितेची सृजन जाणीव ही स्त्रीचा दस्तवेज आहे म्हणजे आपली ती आई अन् दुसरी ती बाई.म्हणून या सर्वहारा स्त्रीवादी वेदनेचा हुंकार म्हणजे हा बाईचा दस्तवेज.अनेक युगाच्या मानगुटीवर बसून ती अद्वैत अदम्य् इच्छेने जगते आहे.ती सुखदु:खाच्या चुल्ह्यावर जळतं,करपतं, भाजतं, शिजतं,कधी उतू जातं.कधी जळून दुधाचीचं साय होते.तीचं बाईची आईची माय होते.या युगाची पुन्हा पहाट होते.न्हाती धूती होते.हळद लागते.ती पिवळी नवरी होते.गळ्यात पोतं काळेमनी.सुखाची न्हावून घेते न्हानी.बाई दु:खाची सवाशीन.पुन्हा दु:खाचा फोड घेऊन ती काटेरी उणग्यावर ढणाढणा जळतं राहिली.नांदण्यासाठीचं गोंदून घेतलं कपाळी.ती ओंजळभर सुखाच्या सावलीत नांदलीचं नाही.कायम दु:खाचा घोगल्या (फोड) घेऊनचं ती युगानुयुगे जगते आहे.माय मुलगी,सुन सासू या रूपात तीचं मातृत्व डफाळून आलं.तिनं तिच्याचं रक्तामासाने अन् दूध-अमृताने वंशजाचं भरणं पोषण केलं.पण तिच्या वाट्याला सुख नाही आलं.तोच हा सखेद वेदनेचा बाईपणाचा दस्तवेज.कवी लिहितो," चिरबंद भिंतीच्या आतला आवाज,खोल बाईपणाचा तळ, करपल्या काळाचंदुखनं, वेदनेच्या सुयांनी विनते नक्षीदार झालयं, आभाळ गाभूळते पण कोसळतं नाही..कविते,तू येतं नाहीस.जीव शांत होतं नाही "(पृष्ठ १२) कवीच्या या प्रतिमेला इतका खोलवर तळ आहे की,ही कविताचं बाईच्या अनादी अनंत तळ डोहाची साक्ष आहे.बाईच्या पदर सावली.बाईच्या तळपायाचा रुतलेला काटा,बाईचं गरोदरपण,बाईचं घेते दखल 'रोपाची झाड होई पर्यंत जगायचं आम्हाला'.हासमकाल कवेत घेताना ही कविता अत्यंत निस्सीम भक्तीने सजग होऊन येते.जशी" काटेरी फांदीतून गच्च मधाचा कांदा काढून विकणारी परकरी पोरं.कुणी नतदृष्ट ऐसीतून काच खाली करून तिला नखशिखांत निहाळतो.कोवळ्या मनाचा मोहर कापत जातो.तेव्हा उगवतो कवितेचा कोंब.."(पृष्ठ १५) बाईचं नांदनं तेचं जन्माचं गोंदण होऊन जाताना ही एक अंतरंगी चारगाठ बांधली इतकी सशक्त कविता आहे.या कवितेने बाईपणाच्या अलगद खपल्या काढतं तितक्याच अलवारपणे आईनं लेकरू नाव्हू माखूघालवं तितक्या सहजपणे हा बाईचा दस्तवेज मांडला आहे.ही कविता अतिशय चिंतन आशय संपन्न प्रतिमा,प्रतिकातून प्रकट होते.'बाईचा दस्तवेज' किती मायाळू बटवा म्हणून निर्लेप नितळ श्रेध्दय भावनेतून येतो तो असा "एक चिमणी घेऊन मी शोधतोय काळ्याकुट्ट अंधारलेल्या संदूकात तुझ्या गर्भातून आलेत साखरेचं कोंभ मग, ठेवला असेल कुणीतरी लिहून तुझ्या ही दस्तऐवज"....(पृष्ठ ३२) जपून टाक पाय,पोरी,शेरडं वळणारी पोरं, खरंच या कवितेमधून हरेक गाव खेड्यातील तांड्या वस्तीत अजून कोसो मैल दुर आहेत शिक्षण संजीवनी पासून ती फक्त मादी.गळ, चिमण्या, सोबत शिकणाऱ्या पोरी,बाई माहेर, बाईपणाचं जगणं,घास..बाई कुठून शिकली असेल? या कवितेच्या युगांची नाळ ही कायम भुईमूगशी आहे या बाईनंच या मातीत रुजायचं अन् नव्याने अंकुरून लदबदून येण्याचं.फक्त शेंगदाणे द्यायचे अन् बाईने टलफर होऊन उकिरड्यावर जायचे.हे बाईचं अहेवपण आयुष्य कवीने उन्नत भावनेतून उलगडून दाखवले आहे.बाई कुठून आणते बळ?झिजवते धड,पण ती कधीचं कन्हत नाही कुथतं नाही केवळ उन्मत्त खानदानी बाईपण घेऊन जगणारी बाईचं बाईपण दाखवणारी कष्टवंत होऊनच राहते.तरी ही 'बाईलाचं येसण,बाई अशीच असते,माती उन्हं पिऊन,बाई एवढाच फरक,खूरपणीचे हात,पायखुटी,माती,हात आभाळाला,मातीकडं बोट,वाटणी,ती घालते जन्माला नाती,पांढऱ्याफट्ट पाली,सनकावा, निखळ बाई,घर सोडावं लागेल.बाईच्या निमुटपणे सहनशीलताचा हाआवाका लक्षात घेतला तर बाई युगांची बटीक म्हणूनचं आहे की काय?तर नाही.आजच्या समकालावर ही कविता बाईचं बाईपण निखालसपणे मांडते.या कवितेची कुस हीशेती मातीशी नाळ नातं सांगणारी आहे.म्हणून हात आभाळाला मातीकडं बोट,तरीही बाईलाच पायखुटी.हा संयत भावविद्रोह होऊन आलेला आहे.तरीहीबाईचा दस्तवेज एक सृजनशील पवित्र भावनेतून येतो.बाई कशी तळपते,बाई कशी झिजते,बाई कशी उसवते,बाई खरंच किती महान असते? 'लाल गल्लीच्या रस्त्यावर' असभ्यतेच्या कोपऱ्यावर, वखवखलेल्या नजरा,भूकेच ही फिल्मी भूत करून, देहाच्या बाजारात कसाई, तुरीच्या शेंगा ओरबाडून, सुकुमार देहाचा पाचोळा, मखमली बिछान्यावर मुर्दाडासारखा..हे सारं पाहताना कुणी तरी तत्वज्ञानाचे अमृत डोस पाजतात.तेव्हा कवी 'म्हस्के मारींगें कस्के' या युक्ती प्रमाणे,गच्च टपोऱ्या मक्याचं कणीस."साहब' या वखवखलेल्या नजरेला शांत करतो आम्ही नाहीतर....या नरपशुंच्या तावडीतून सुटल्या असत्या का लेकी बाळी सुध्दा?लाल गल्लीच्या भट्यावरटपोऱ्या कणासाचे भूट्टेअसे भाजले जातात, सभ्यतेच्या तप्त तव्यावर (पृष्ठ ७८)असे त्यांनी शब्दांच्या वाधीने व्यवस्थेवर कस्के आसूड ओढले आहे.बाईचा दस्तऐवज ही कविता अतिशय खोल मनाच्या डोहातून आलेली आहे. तिला चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक्ता आहे.कवी श्रीनिवास म्हस्के मनोगत ही निर्धार पुर्वक व्यक्त करतात जसे"कवितेची निर्मिती प्रक्रिया ही'भिगोंया,ध्योंया,होगया' अशी फटाफट नसते.मनात धुमसत असलेल्या संवेदना मुरू घालून,आंबाड्या भिजू घालून त्याचा दाग काढावा, तसं छिलू द्यावं लागतं मनाला.तेव्हा बी रुजून अलवार कोंब फुटावे तशी मातीला फाडून वर येत असते कविता.असं म्हणतात, आपल्याही अस्तित्वाचं सोनं व्हावं म्हणून एक अस्सल दु:ख कवीचा पत्ता शोधत असतं.कवी होणं एवढं सोपं नसतं.(मनोगत)ही कवीची प्रतिभा सृजन फुलवते.अतिशय नितळ श्रेध्दय भाव आत्मविश्वासाची पावले ठळकपणे दाखवून देते.हेकवितेचं निस्सीम भक्तीचं मंदिर आहे.या आशय संपन्न कवितेची पाठराखण ख्यातनाम कवयित्री डॉ.वृषाली किन्हाळकर लिहितात "स्त्रीच्या जगण्यातले आदिम ठोकताळे सखेद नोंदविणारी ही कविता,स्त्रीचे बदलते रुप-रंग देखील सहर्ष टिपते.कवी श्रीनिवास म्हस्के यांना धरणीचा निदिध्यास आहे.माती आणि बाई यांची चिवट जिविषा कवीला आमंत्रित करते.अन् मग आपसुकच शब्द पेरले जातात.प्रसवशील निर्माणशील आणि सहनशील अशी बाई जिथे तिथे दिसते तिथे कवी नतमस्तक होतो.माती आणि बाईपणाचा असा अपरंपार जिव्हाळा या कवितेला एक अनावर अवेग देतो आणि यमक अनुप्रास,लय ताल यांचे कडे- किनारे तोडून ही कविता थेट काळजात शिरते.(मलपृष्ठ)हा सविनय आशीर्वाद हा या कवीचा स्नेहाळू अनुबंध आहे.अक्षरवाड्मय प्रकाशनाचे बाळासाहेब धोंगडे यांनी अतिशय देखणा साज बांधला आहे.सरदार जाधव यांचे मुखपृष्ठ हे अतिशय आशय संपन्न झाले आहे.ख्यातकिर्त चित्रकार श्रीधर अंभोरे दादांचे रेखाचित्रे ग्रामीण स्त्रीभावविश्वाचे चिंतन आशय संपन्न असे आहे.यापुर्वी'गावभूईचं गोंदण' या कवितेचा अनुबंध कृषकाची सखेद वेदना होती.ना.धों महानोर दादांची पाठराखण.हा या कविता वाड्मयीन मूल्य निकषांवर निस्सीम भक्तीने गाव शिवार गोंदण करून गेलेली कविता.आता निखळ गाव शिवारातील बाई आणि तिची सनातन वेदनाची दु:खरी,सल अजूनही कायम आहे.सुगरणीचं घरटं बांधतांना तिचं रिंगण भारल्यापणाची पोटूशी तगमग.जीवाला लख्ख उजळून घेते.लेकुरपणाचं झिजणं झुरणं म्हणजे हा देहिक भावनेचा कायिक आविष्कार केवळ बाईचं करते.म्हणून हा बाईपणाचा दस्तऐवज अतिशय समृद्ध सकारात्मक समर्थ कविता.कवीवर्य शब्द स्नेही सन्मित्र मनस्वी शुभेच्छा.

**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**

कवितासंग्रह:-बाईचा दस्तऐवज

कवी:- श्रीनिवास म्हस्के, नांदेड

प्रकाशक:-बाळासाहेब घोंगडे

अक्षरवाड्मय,प्रकाशन, पुणे

मुखपृष्ठ:-सरदार जाधव, संभाजीनगर

रेखाटने:-श्रीधर अंभोरे, जालना

प्रथमावृती:-१ जुलै २०२४

किंमत:-२२५ रूपये

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३० जानेवारी २०२६


## ओंजळीतून निसटलेलं गाव

आता आठवत राहतात
जगण्याच्या धावपळीत
ओंजळीतून निसलेले
बालपणीचे हळवे क्षण

आता हरवली किलबिल
घरट्यातील पाखरांची
अन् मंजुळ किणकिण
गायी-वासरांच्या घंटीची

आता राहिली नाही
गोठ्यात गाय
अन् मातीच्या घरात
भोळीभाबडी माय

आता उडून गेले
थवे पाखरांचे
अनोळखी वाटेने
अन् झाडासोबत
घरटेही उदासले

आता राहिली नाही कळा
मातीच्या कुलूपबंद घराला
पोचारा फिरवणारी माय
अन् सावली देणारा बाप
अंनताच्या प्रवासाला गेल्याने
अन् मी सिमेंटचा जंगलाचा
रस्ता धरल्याने

आता गावाकडच्या वाटा
दबून गेल्या
निष्ठूर सिमेंट अन् डांबराने
गावमाणसाच्या मनासोबत

आता सारंच बदललं
ऊन वारा डोक्यावर घेऊन
गावाला सावली देणारी
मोठमोठी झाडे कोसळली
अन् गाव उन्हात पडलं

गावाकडे गेलो तरी
भेटत नाही
बालपणीचे मित्र
ते राबत असतात
इतभर पोटासाठी
रात्रदिस मातीत

अन् काही गेले
आपापल्या वाटेने
पोटापाण्याच्या शोधात

आता
मातीची चूल गेली
चिमणीची वात गेली
चांदण्याची रात गेली
पारावरची बात गेली
सुगीतल्या खळ्यातली
बैलाची पाथ गेली

पण गाव.. शिवार
माय, माती, माणसं
हळुवार जपून ठेवले मी
काळजाच्या गाभाऱ्यात
पहिल्या पावसाच्या
गोड सरींसोबत

**कवी ज्ञानेश्वर गायके**

## नजर

ती चालते रस्त्यावर,
नजर चालते आधी;
देह पोहोचतो नंतर,
माणूसपण येते शेवटी—
पण त्याला येऊच दिलं जात नाही.

ती कशी दिसते—
हाच प्रश्न पुढे;
ती काय करते—
उत्तर उशिरा येते.
नजरच ठरवते माप,
असणं हरवतं पाहण्यात.

बसमध्ये, बाजारात,
ऑफिसच्या दारात;
तिच्या हसण्यावर सतत पहारा,
तिच्या शांततेवर कायमचा कारावास.
तीच स्वतःची पहारेकरी—
नजर आत उतरली हळूच.

"असं हसू नको,"
"असं बोलू नको,"
"लक्ष वेधू नको"—
हे धडे नाहीत शिस्तीचे;
हे धडे आहेत
नजरेच्या नियंत्रणाचे.

पुरुषाची नजर स्वैर,
स्त्रीची इच्छा—अपराध;
तिने मागितलं स्वातंत्र्य,
त्यावर चढला चारित्र्याचा फास.
दोष तिचा, चर्चा तिची—
नजर मात्र निरपराध.

पडद्यावरची स्त्री सुंदर,
जाहिरातीतली परिपूर्ण;
खरी स्त्री आरशात विचारते—
"मी कमी आहे का, अजून?"
मान्यता हवी पुरुषाची—
तेही या नजरेचं फळ.

पण एक दिवस
ती थांबते;
नजरेला नाव देते;
उधार घेतलेलं मोजमाप
परत जमिनीवर ठेवते.
"मी कशी दिसते?" नव्हे—
"मला काय हवं?" विचारते.

देह उरतो देह न राहता,
तो श्रम, अनुभव, स्वप्न बनतो;
दिसणं मागे पडतं,
असणं पुढे सरकते.

मेल गेज तोडणं म्हणजे
युद्ध नाही पुरुषाशी;
तो प्रश्न आहे त्या व्यवस्थेला,
जो स्त्रीला केवळ दृश्याशी बांधतो.

आत्मदृष्टी ही पूर्ण मान्यता नाही—
ती झुंज आहे अखंड खरी;
पण त्यातच स्त्री
स्वतःची नजर परत मिळवते खरंच.

**प्रभाकर गायकवाड**
छत्रपती संभाजीनगर




कन्नड तालुक्यातील राष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू खेळाडू समृद्धी प्रवीण शिंदे हिचा सत्कार करताना उपविभागीय अधिकारी संतोष गोराड व तालुका क्रीडा संकुल समितीचे कार्याध्यक्ष व तहसीलदार सारिका भग त नगराध्यक्ष फरीन बेगम अब्दुल जावेद गटविकास अधिकारी डॉ ओमप्रकाश रामावत तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य प्रवीण शिंदे आदि.

## आंबेडकरी पत्रकारितेचा वैचारिक जागर : 'मूकनायक दिना' निमित्त एकदिवसीय परिषद

**छत्रपती संभाजीनगर :** आजच्या काळात वर्तमानपत्रातील बातम्यांची जागा भावनांनी घेतली असून, बुद्धिनिष्ठ मतांची जागा बुद्धीशून्य वासनांनी घेतली आहे. जबाबदार लोकांच्या विवेकाला साद घालण्याऐवजी बेजबाबदार आवाहनांचा सुळसुळाट होत आहे, अशी परखड मांडणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४३ सालीच केली होती. या विचारांचा अन्वय आजच्या माध्यमविश्वाशी लावत 'मूकनायक दिना'निमित्त मेत्ता संघ छत्रपती संभाजीनगरच्या वतीने एकदिवसीय वैचारिक परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद ३१ जानेवारी २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगरच्या सेमिनार हॉलमध्ये होणार असून सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विविध सत्रांतून आंबेडकरी पत्रकारिता, संवादशास्त्र, कला, लोकसंवाद व नवमाध्यमांवर सखोल चर्चा होणार आहे.परिषदेतील पहिले सत्र सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत होणार असून त्याची संकल्पना 'आंबेडकरी पत्रकारिता : प्रतिकार, प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्यायासाठीचे संवादशास्त्र' अशी आहे. या सत्राचे उद्घाटन प्रसिद्ध सिने-नाट्य व दूरदर्शन अभिनेते प्रवीण डाळिंबकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी डॉ. यशवंत भंडारे आंबेडकरी पत्रकारितेचे स्वरूप, व्याप्ती व आव्हाने मांडणार असून, आयु. शांतीलाल गायकवाड मुख्य प्रवाही माध्यमे व सामाजिक न्याय यावर चिकित्सात्मक दृष्टिक्षेप मांडतील. तसेच डॉ. स्वर्णमाला म्हस्के दलित-बहुजन महिलांच्या संदर्भात माध्यमांची भूमिका स्पष्ट करतील, तर राहुल पगारे आंबेडकरी संवादशास्त्रातील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक राजकारणावर प्रकाश टाकतील.दुपारी २ ते २.३० या वेळेत मध्यांतरानंतर दुसरे सत्र दुपारी २.३० ते सायंकाळी ५ या कालावधीत 'न्यू मिडिया, कला आणि लोकसंवाद' या विषयावर होणार आहे. या सत्रात प्रा. डॉ. प्रकाश शिरसाठ आंबेडकरी संवादशास्त्रातील कला व सामूहिक चेतनेवर मांडणी करतील. डॉ. वैशाली बोडले लोककलेची आंबेडकरी चळवळीतील भूमिका स्पष्ट करतील, तर प्रा. संजय मोहोड आंबेडकरी जलसा, लोकसंवाद आणि सामाजिक परिवर्तन यावर भाष्य करतील.याशिवाय प्रा. डॉ. किशोर वाघ आंबेडकरी संगीत व प्रति-प्रभुत्ववादी राजकारणाचा संवाद उलगडतील. संजना खंदारे आंबेडकरी महिलांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्ममधील संधी व आव्हाने मांडतील, तर उन्मेष खंडागळे नवमाध्यमे, संस्कृती आणि भारतीय समाजाच्या पुनर्रचनेवर आपले विचार व्यक्त करतील. परिषदेबाबत अधिक माहितीसाठी डॉ. सचिन बनसोडे (९४०५३४३५४०), डॉ. संजय पाईकराव (९६७३७८६२३८) व रत्नदीप रगडे (७०३०३०५७९५) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002**

**दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.**

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |